स्थायी समिति
दाखल विषय – दि. २५/५/२०२१

विषय क्रमांक :– २३१ त्वर्य
मा.बाळासाहेब ओसवाल यांचे दि. २५/५/२०२१ चे पत्र.

लोकराज्य ग्राहक सहकारी संस्था मर्यादित, पवार हाईटस्, एफ ०४, शंकर मठ, हडपसर, पुणे ही संस्था महाराष्ट्र अधिनियम १९६० मधील (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२४)कलम ९(१) अन्वये नोंदणीकृत झाली आहे. शासन निर्णय क्रमांक – रोस्वरो–२००२/प्र.क्र.२६७ रोस्वरो–१ अन्वये बेरोजगारांच्या सहकारी सेवा संस्थांना विना निविदा कामे देणेबाबत निर्णय झालेला आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक : भांखस २०२१/प्र.क्र.८/उद्योग–४ दि.७ मे २०२१ अन्वये दरपत्रकाच्या आधारे खरेदीची मर्यादा र.रुपये ३ लाखावरुन र.रु. १० लाखापर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतलेला आहे.

तरी सदर दोन्ही शासन निर्णय नुसार लोकराज्य ग्राहक सहकारी संस्था मर्यादित या संस्थेस पुणे महानगरपालिकेची र.रू.३ लाख ते १० लाखापर्यंत विना निविदा सेवा व खरेदीची कामे देण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– २३२ त्वर्य
मा.सौ.सुनिता गलांडे व मा.सौ.मानसी देशपांडे यांचे दि. २५/५/२०२१ चे पत्र.

मिळकती वारस नोंदी करता प्रथमतः कर देण्यास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती मृत्यु पावल्यास मयत व्यक्तीच्या मालकी हक्काची वारस हस्तांतरण फी संपूर्णत: माफ करण्यात यावी.

वारस नोंदी करताना यामध्ये कोणत्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार होत नाही. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे नागरिकांची आर्थिक परिस्थिती गंभीर आहे. याबाबीमुळे त्यांना थोडा फार दिलासा मिळेल.

तरी मिळकतीवर वारस नोंद करण्यात येणारी फी संपूर्णत: माफ करण्यास व स्थायी समिती ठराव क्र. २३९९ दि.३१/३/२०१५ चे ठरावात याप्रमाणे दुरुस्ती करण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– २३३ त्वर्य
मा.सौ.वर्षा तापकीर व मा.सौ.मानसी देशपांडे यांचे दि. २५/५/२०२१ चे पत्र.

शासनाने मान्य केलेल्या दराने उपलब्ध असलेल्या कोविडशिल्ड व कोव्हॅक्शीन या लसी ९०० रु. या दराने खाजगी हॉस्पिटल मध्ये उपलब्ध करुन देण्यात याव्यात त्यामध्ये जास्त दर आकारल्यास कायदेशीर कारवाई करण्यास तसेच दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल काही प्रमाणात चॅरिटीमध्ये उपलब्ध करुन देत आहेत त्याप्रमाणे करुन देण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– २३४ त्वर्य
मा.सौ.वर्षा तापकीर व मा.सौ.सुनिता गलांडे यांचे दि. २५/५/२०२१ चे पत्र.

कोविडच्या पार्श्वभूमीवर रोजंदारीवर विद्युत दाहिनी व हॉस्पिटल मध्ये काम करणारे कर्मचारी कोरोनामुळे मृत्युमुखी झाल्यास त्यांचे वारसांना र.रु.१० लाख रुपये देण्यास मान्यता द्यावी.

विषय क्रमांक :– २३५ त्वर्य
मा.सौ.वर्षा तापकीर, मा.सौ.मानसी देशपांडे, मा.सौ.सुनिता गलांडे, मा.महेश वाबळे व मा.सौ.मनिषा लडकत यांचे दि. २५/५/२०२१ चे पत्र.

पुणे महापालिकेच्या आरोग्य खात्याकडे ६ महिन्यांच्या कालावधीसाठी एकवट वेतनावर तात्पुरत्या स्वरूपात विविध संवर्गातील पदांच्या सेवा देण्याकरीता मा. महापालिका आयुक्त यांच्या ठरावान्वये मान्यतेनुसार विविध काम करणारे सेवक/परिचारक /ज्यु.नर्स/फार्मासिस्ट या पदावर नियुक्ती करण्यात आलेली होती. यामध्ये नियुक्त झालेले सेवक हे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात नियुक्त केले होते, त्यानंतर कोरोना विषाणूच्या पार्श्वभूमीवर त्यांना पुन्हा मुदतवाढ मिळाली. कोविड–१९ काळात सदर सेवकानी कोविड सेंटर ला जिवाची पर्वा न करता कोरोना काळातही कामे केली असून त्यांना पुन्हा ३ महिने करता मुदतवाढ देण्यात आलेली होती. सद्य परिस्थिती पाहता पुणे शहरात कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव पाहता तसेच म्युकर मायकोसिसवर उपचार करणे व लहान मुलांमध्ये कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव वाढणेची शक्यता पाहता कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत विविध उपाययोजनांसाठी भविष्यात लसीकरण विषयक कामांसाठी सेवकांची गरज लागणार असून अनुभवी सेवकांची आवश्यकता आहे. सबब सदर सेवकांची आवश्यकता असल्याने विविध काम करणारे सेवक/ परिचारक /ज्यु.नर्स/फार्मासिस्ट/वैद्यकीय अधिकारी या पदावर नियुक्ती करण्यात आलेल्या सेवकांना ६ महिन्यांची मुदतवाढ एक दिवसाचा खंड देऊन देण्यात यावी.

विषय क्रमांक :- २३६ त्वर्य
मा.सौ.मनिषा कदम यांचे दि. २५/५/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र. ३८ क मध्ये एक ॲम्ब्युलन्स (ऑक्सिजन सहित) खरेदी करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक,<br>१) बजेट कोड सीई२०अे१०२/एसए२-१२५५, पान क्र. १६१, प्रभाग क्र. ३८ क दत्तनगर व प्रभागात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे<br>२) बजेट कोड सीई२०अे१०२/एसए२-१२५६, पान क्र. १६१, प्रभाग क्र. ३८ क जाधवनगर व प्रभागात विविध ठिकाणी रस्ते विकसित करणे | १० लाख<br><br>१० लाख | ---<br><br>--- |
| नविन सुचविलेली कामे<br>प्रभाग क्र. ३८ क मध्ये एक ॲम्ब्युलन्स (ऑक्सिजन सहित) खरेदी करणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :- २३७ त्वर्य
मा.युवराज बेलदरे यांचे दि. २५/५/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र. ४० अ मध्ये एक ॲम्ब्युलन्स (ऑक्सिजन सहित) खरेदी करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक,<br>१) पान क्र. २४०, प्रभाग क्र. ४० अ अंजलीनगर मध्ये विविध विकास कामे करणे. (CE22A548/SJ10-2813)<br>२) पान क्र. १६१, प्रभाग क्र. ४० अ दत्तनगर परिसरात रस्ते डांबरीकरण करणे. (CE20A102/SA2-1275) | १० लाख<br><br>१० लाख | ---<br><br>--- |
| नविन सुचविलेली कामे<br>प्रभाग क्र. ४० अ मध्ये एक ॲम्ब्युलन्स (ऑक्सिजन सहित) खरेदी करणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :- २३८ त्वर्य
मा.सौ.कालिंदा पुंडे यांचे दि. २४/५/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र. २५ ब मध्ये नव्याने अद्ययावत ॲम्ब्युलन्स खरेदी करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक,<br>बजेट कोड क्र:- CE20B102/ST2-1398, पान क्र. २०५, प्रभाग क्र-२५ ब मध्ये वानवडी येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात सुशोभिकरण करणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. २५ ब मध्ये नव्याने अद्ययावत ॲम्ब्युलन्स खरेदी करणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्रमांक :- २३९ त्वर्य

आरोग्य खात्याकडे सहा महिन्यांच्या कालावधीसाठी करार पद्धतीने एकवट वेतनावर विविध संवर्गातील पदांच्या सेवा घेणेबाबत खालील बाबी अवलोकनार्थ सादर केल्याची नोंद घेण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१०७ दि. २०/५/२०२१ चे पत्र.

१. वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) ५० पदे, वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) ५० पदे, ऑक्झिलरी नर्स १०० पदे, नर्सिंग ऑर्डर्ली १०० पदे, आया १०० पदे, इंटेन्सिव्हिस्ट ०६ पदे, आय. सी. यु. फिजिशियन ०६ पदे, पेडियाट्रिशियन १० पदे व नवजात अर्भक तज्ञ ०५ पदांची सेवा ४४ दिवसांच्या करार पद्धतीने घेणेस व एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन पुढील ४४ दिवसांसाठी मुदतवाढ ६ महिन्यांपर्यंत देणेस.
२. वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) पदाचे ५० उमेदवार प्राप्त न झाल्यास रिक्त पदे वैद्यकीय अधिकारी (बी.ए.एम.एस.) या पदाची भरणेस.
३. सदर सेवकांना देण्यात येणारे वेतन हे RE17F257 – कोविड अंतर्गत अत्यावश्यक महसुली कामाकरिता खर्च वेतन या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस.
४. सदर पदभरती करताना रोस्टर न लावणेस व एक महिन्याचे वेतन अनामत रक्कम म्हणून जमा न करून घेणेस.
५. करार पद्धतीने सेवा घेण्याकरिता खात्यामार्फत प्रगट मुलाखती न घेता, उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार गुणांकन करणेस.
६. निवड झालेल्या उमेदवारांकडून त्यांच्या पदाचा राजीनामा देणे पूर्वी एक महिन्याची पूर्व सूचना दिले नंतर राजीनामा मंजूर करावे नाहीतर नोकरी सोडते वेळी एक महिन्याचे मानधन पुणे महानगरपालिका कोष कार्यालयास भरणेस.
७. सदर भरती प्रक्रीये दरम्यान उमेदवार प्राप्त न झाल्यास “खुल्या वर्गातील उमेदवार ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा ५ वर्षाने शिथिल असेल” हि अट शिथिल करून “उमेदवाराचे वय जाहिरातीच्या दिनांकास ६२ वर्षापेक्षा जास्त नसावे “ अशी करणेस.

विषय क्रमांक :– २४० त्वर्य

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय धनकवडी सहकारनगर कार्यालया अंतर्गत झाडण कामाकरीता मजूर पुरविणे बाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.३/१०८,दि.२०/०५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– २४१ त्वर्य

अनुकंपा तत्वावर नोकरी मिळणेचे मागणीबाबत मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील वस्तुस्थिती मे. राज्य शासनाचे निदर्शनास आणून शहर अभियंता कार्यालयाकडील दिवंगत अधिकारी कै. जयंत भाऊराव सरवदे, कार्यकारी अभियंता, श्रेणी – १ यांची वारस म्हणून त्यांची अर्जदार मुलगी कु. अपूर्वा जयंत सरवदे यांना अथवा अन्य पात्र वारसास संदर्भीय शासन निर्णयातील तरतुदींमधून शिथिलता देऊन विशेष बाब म्हणून अनुकंपा तत्वावर पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील मंजूर पदावर नियुक्ती देणेस व त्याबाबत प्रस्ताव शासन मान्यता मिळणेसाठी सादर करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था–४/१११ दि. २०/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– २४२ त्वर्य

भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली जीप संवर्गातील वाहने पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. स्वंयभु ट्रान्सपोर्ट, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर रक्कम रु. रु. १,००,००,०००/– पेक्षा ९.९०% जादा) असल्याने त्यांचेकडून काम काम करून घेणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/११२ दि. २४/५/२०२१ चे पत्र.

१) भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली जीप संवर्गातील वाहने मे. स्वंयभू ट्रान्सपोर्ट, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडर दराने (९.९०% ने जादा) एकूण रुपये १,०९,९०,०००/– (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी नऊ लाख नव्वद हजार फक्त) पर्यंत आवश्यकतेनुसार भाडेतत्वावर घेणेस व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेस –––
२) प्रकरणी कोविड–१९ विषाणूच्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी करावयाचे कामकाजाअंतर्गत मनपाचे विविध दवाखाने, क्षेत्रिय कार्यालये डॉक्टर, नर्स वैंद्यकीय कामकाज करणारे कर्मचारी, क्वारंटाईन सेंटर, कोरोना विषयक जनजागृती करणे या कामासाठी तसेच मनपाच्या अत्यावश्यक कामी पुरविण्यात येणारी वाहने अपुरी असल्याने, भाडेतत्वावर वाहने घेणेची सेवा बंद करणे शक्य नसल्याने या निविदाचे ब पाकीट उघडल्याच्या दिनांकानंतर म्हणजेच दि. ०१/०४/२०२१ पासून घेणेत येत असलेल्या भाडेतत्वावरील वाहनांचे कामास पश्च्यात मान्यता मिळणेस –––

विषय क्रमांक :- २४३ त्वर्य

ग्रेड १ दर्जाच्या विश्रामबागवाडा या ऐतिहासिक वास्तुची धोकादायक मेघडंबरीची जतन संवर्धनाची व तदनुषंगिक वैशिष्ट्यपुर्ण कलाकसुरीची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.विशाल अॅन्ड आकाश असोसिएटस यांचे टेंडर सर्वात जास्त रक्कमेचे (टेंडर र.रु.१,४२,८४,५०१=५० पेक्षा ३.९०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु. १,४८,४१,५९७=०६ पर्यंत अधिक जी.एस.टी. र.रू.१७,८०,९९१=६५ पर्यंत टेंडर अटीशर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/११७ दि. २४/०५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- २४४ त्वर्य

हडपसर मुंढवा क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत येणाऱ्या नाल्याची साफसफाई करणे व गाळ काढणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रु. ५०,०८,४७८/- पेक्षा ३५.६००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३२,२५,४५९=८३ व अधिक जी.एस.टी. र. रू. ३,८७,०५५=१८ अधिक रॉयल्टी चार्जेस र. रू.८,९०,४४२/- असे एकुण र.रु. ४५,०२,९५७/- रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मलनि:/११८ दि.२५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- २४५ त्वर्य

कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालयाच्या अखत्यारितील नाला साफसफाई करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अवधूत रामदास खिलारी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रु. ५१,७८,७५३=१० पेक्षा ४१.३३०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३०,३८,३७४=४४ व अधिक जी.एस.टी. र. रू. ३,६४,६०४=९३ अधिक रॉयल्टी चार्जेस र. रू.६,९९,६३३/- असे एकुण र.रु. ४१,०२,६१२=३७ रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मलनि:/११९ दि.२५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- २४६ त्वर्य

येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालयाच्या अखत्यारितील नाला साफसफाई करणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.बी.एन.चव्हाण यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रु. ५४,०६,७२०/- पेक्षा ४१.९०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३१,४१,३०४=३२ अधिक जी.एस.टी. र. रू. ३,७६,९५६=५२ अधिक रॉयल्टी चार्जेस र. रू.४,३९,६८८/- असे एकुण र.रु. ३९,५७,९४८=८४ पर्यंत होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मलनि:/१२० दि.२५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- २४७ त्वर्य

झोन क्र. ३ अंतर्गत नाले रुंदीकरण व खोलीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आकाश कंन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रु. ६०,९०,१२७=५० पेक्षा ३८.४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३७,५१,५१८=५४ अधिक जी.एस.टी. र. रू. ४,५०,१८२=२२ अधिक रॉयल्टी र. रू. ६,७८,४३२/- एकुण र.रु. ४८,८०,१३२=७६ पर्यंत होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मलनि:/१२२ दि.२५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- २४८ त्वर्य

झोन क्र. ४ अंतर्गत फुरसुंगी दशक्रिया घाट व स्मशानभूमी लगत नाले रुंदीकरण खोलीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.हरिश्चंद्र रंगनाथ अनारसे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रु. ५६,७३,३४७/- पेक्षा ३९.७८०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३४,१६,४८९=५६ व अधिक जी.एस.टी. र. रू. ४,०९,९७८=७५ अधिक रॉयल्टी चार्जेस र. रू.११,४४,८५४/- असे एकुण र.रु. ४९,७१,३२२=३१ रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मलनि:/१२३ दि.२५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– २४९ त्वर्य

प्रभाग क्र. २८ क मधील औद्योगिक वसाहत येथील व्हेईकल डेपो लगत पितळे चौक, चितळे फॅक्ट्री ते कटारिया शाळेपर्यंत मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सार्थक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रु. ४४,९९,९४६=५० पेक्षा ०.५०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ४४,७७,४४६=७७ व अधिक जी. एस. टी. र. रू. ५,३७,२९३=६१ असे एकूण र.रु. ५०,१४,७४०=३८ व विशेष भाववाढ (स्टार रेट) येणारी फरकाची रक्कम देणेस अथवा कपात होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मलनिःसारण/१२४ दि.२५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– २५० त्वर्य

झोन क्र. २ अंतर्गत नाले रुंदीकरण व खोलीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आकाश कंन्स्ट्रक्शन यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रु. ६३,५५,६८०=४० पेक्षा ३८.४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३९,१५,०९९=१२ अधिक जी.एस.टी. र. रू. ४,६९,८११=८९ अधिक रॉयल्टी र. रू. ३,८१,६१८/– एकुण र.रु. ४७,६६,५२९=०१ पर्यंत होणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मलनिः/१२५ दि.२५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– २५१ त्वर्य

बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयाच्या अखत्यारितील नाला साफसफाई करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.नम्रता कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे ( टेंडर र.रु. ५१,७८,८७९/– पेक्षा ४०.००% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३१,०७,३२७=४० व अधिक जी.एस.टी. र. रू. ३,७२,८७९=२९ अधिक रॉयल्टी चार्जेस र. रू.६,९९,६३३/– असे एकुण र.रु. ४१,७९,८३९=६९ रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मलनिः/१२६ दि.२५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– २५२ त्वर्य

वानवडी रामटेकडी क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत येणाऱ्या नाल्याची साफसफाई करणे व गाळ काढणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.काशिनाथ सिताराम कुमावत यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५०,०८,३६९/– पेक्षा ३३.८०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३३,१५,५४०=२८ व अधिक जी.एस.टी. र. रू. ३,९७,८६४=८४ अधिक रॉयल्टी चार्जेस र. रू.८,९०,४४२/– असे एकुण र.रु. ४६,०३,८४७=११ रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मलनिः/१२७ दि.२५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– २५३ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या कमला नेहरू हॉस्पिटल,राजीवगांधी हॉस्पिटल,जयाबाई सुतार हॉस्पिटल,डॉ.नायडू सांसर्गिक हॉस्पिटल,सोनावणे हॉस्पिटल,व इतर हॉस्पिटलची अंतर्गत व बाह्य परिसराची जंतुनाशकासहित यांत्रिकी पद्धतीने आऊटसोर्सिंगद्वारे साफ सफाईचे काम करून घेणे कामी बी-१ पद्धतीने निविदा मागविण्यात आल्या असता एकूण पाच निविदाधारकांपैकी L-१ निविदाकार मे. विशाल एक्सपर्ट सर्व्हिसेस प्रा.ली यांचे दर (पु.ग.प. रक्कम.रु **११.५५** प्रतीमहा.प्रतीस्क्वेअर फुट GST वगळून) पु.ग.प पेक्षा ३५.७००% कमी आल्याने सदर निविदेमध्ये GST वगळून सर्वात कमी दर देणारे मे .विशाल एक्सपर्ट सर्व्हिसेस प्रा.ली.पुणे ,यांचेकडून प्रती महा प्रती स्के.फुट रक्कम रुपये ७.४२७ (अक्षरी-सात रुपये त्रेचाळीस पैसे प्रती महा प्रती स्के.फुट ) अधिक GST या प्रमाणे पुढील २४ महिन्या करिता एकूण निव्वळ होणाऱ्या जागेवरील मोजमापानुसार काम करून घेणेस त्यासाठी त्यांचेशी करारनामा करणेस त्यापोटी होणारे त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता देण्याबाबत अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१२८ दि.२५/५/२०२१ चे पत्र.

सदर काम करून घेणेसाठी खाली नमूद केलेल्या अर्थशीर्षकावर पुरेशी आर्थिक तरतूद उपलब्ध आहे.

अर्थशीर्षक सन.२०२१-२२ RE17F140 B
कमलानेहरू रुग्णालय व इतर रुग्णालय येथे यांत्रिकी पद्धतीने साफ सफाई करणे,
विविध सेवक वर्ग ठेकेदारी पद्धतीने नेमणे.
मान्य तरतूद रक्कम रु,७,२०,०००००/-

विषय क्रमांक :- २५४ त्वर्य

टेंडर क्र. ४३/२०२०-२०२१ नुसार भाडेतत्वावर टुरिस्ट परवाना असलेली इको संवर्गातील वाहने मे. चिन्नु ट्रॅव्हलर्स, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडर दराने (७% ने जादा) निविदा रक्कमेच्या वाढीव ५०% म्हणजेच वाढीव रक्कम रुपये ५३,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये त्रेपन्न लाख पन्नास हजार फक्त) पर्यत अगर नविन निविदा मान्य होईपर्यत प्रत्यक्ष होणाऱ्या रक्कमेपर्यत घेणेकामी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/१२९ दि. २५/५/२०२१ चे पत्र.

१) मे.चिन्नू ट्रॅव्हलर्स, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडर दराने ((७% ने जादा) निविदा रक्कमेच्या वाढीव ५०% म्हणजेच वाढीव रक्कम रुपये ५३,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये त्रेपन्न लाख पन्नास हजार फक्त)पर्यत अगर नविन निविदा मान्य होईपर्यत प्रत्यक्ष होणाऱ्या रक्कमेपर्यत घेणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस ---

२) प्रकरणी मनपाचे प्रशासकीय कामी तसेच कोविड - १९ चे प्रशासकीय व वैंद्यकीय कामकाज करणेसाठी या निविदामधून दि.०१/०३/२०२१ पासून भाडेतत्वावर वाहने घेण्यात येत असल्याने केलेल्या कामाची पश्च्यात मान्यता मिळणेस व त्यापोटी देयके आदा करणेस----

म्हणजेच या निविदाकरीता यापुर्वीची मान्य रक्कम रु. १,०७,००,०००/- व निविदाची वाढीव ५०% रक्कम रु. ५३,५०,०००/- अशी एकूण रक्कम रु. १,६०,५०,०००/- इतकी रक्कम खर्च होणार आहे.

विषय क्रमांक :- २५५ त्वर्य

राजीव गांधी प्राणीसंग्रहालय येथे प्राण्यांच्या खाद्यासाठी लसूनघास निविदा क्र. ४७६/२०१८ चे निविदादार मे.ईश्वरी ट्रेडींग कॉर्पोरेशन यांचेकडून दि.५/१/२०२१ ते दि. १०/२/२०२१ अखेर पुरवठा करणेत आलेल्या मालाचे देयक र.रु. २,३०,३६६=७० निविदा क्र. ४७६/२०१८ मधील नमुद दराने त्यांना अदा करणेस पश्चात मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/उदयान/१३० दि. २५/५/२०२१ चे पत्र.

(टिप :- नवीन निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन निविदादारास कार्यारंभ आदेश देईपर्यंत प्राण्यांची उपासमार होऊ नये म्हणून पुर्वीचे निविदाधारक मे.ईश्वरी ट्रेडींग कॉर्पोरेशन यांजकडून मालाचा पुरवठा चालू ठेवणे क्रमप्राप्त होते.)

विषय क्रमांक :- २५६ त्वर्य

रक्कम रू.३० कोटीची गुंतवणूक करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१३१ दि. २५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- २५७ त्वर्य

रक्कम रू.३० कोटीची गुंतवणूक करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१३२ दि. २५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- २५८ त्वर्य

रक्कम रू.३० कोटीची गुंतवणूक करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१३३ दि. २५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- २५९ त्वर्य

रक्कम रू.३० कोटीची गुंतवणूक करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१३४ दि. २५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- २६० त्वर्य

रक्कम रू.३० कोटीची गुंतवणूक करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१३५ दि. २५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :- २६१ त्वर्य

रक्कम रू.७० कोटीची गुंतवणूक करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१३६ दि. २५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– २६२ त्वर्य

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत उद्धवलेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये पुणे महानगरपालिकेच्या दळवी हॉस्पीटल,शिवाजीनगर येथे कोव्हीड –१९ सेंटर आय.सी.यु.बेडसाठी १ KL क्षमतेची –०२ नग क्रायोजनिक लिक्विड ऑक्सीजन टँक बसविणे व तदनुषंगिक कामे करणे हे काम मे.पुना इंजिनिअर्स, चिंचवड पुणे यांचेकडून र.रू.४,४१,२५०.०० पर्यंत कामे करून घेतल्याची बाब व त्यांनी केलेल्या कामापोटी त्यांना बिल अदा केल्याची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/१३७ दि. २५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– २६३ त्वर्य

रक्कम रू.७० कोटीची गुंतवणूक करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१३८ दि. २५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– २६४ त्वर्य

रक्कम रू.७० कोटीची गुंतवणूक करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१३९ दि. २५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– २६५ त्वर्य

रक्कम रू.७० कोटीची गुंतवणूक करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१४० दि. २५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– २६६ त्वर्य

रक्कम रू.७० कोटीची गुंतवणूक करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/१४१ दि. २५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– २६७ त्वर्य

महापालिकेच्या दळवी हॉस्पिटलमध्ये ऑक्सिजन जनरेटिंग प्लान्ट बसविणेसाठी मा.महापालिका आयुक्त यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) नुसार खालील बाबींस मान्यता मिळाली असून जागेवर काम चालू करण्यात आले आहे.

१) दळवी हॉस्पिटलमध्ये ऑक्सिजन जनरेटिंग प्लान्ट बसविणे व त्यासाठी रक्कम रूपये २,१०,९२,३००/- +२५,३१,०५२/-(१२% जी.एस.टी) असे एकूण रक्कम रूपये २,३६,२३,१५२/- इतका खर्च करणेस आणि सदरचे काम सेक्युरिस्क मल्टीपल सोलुशन यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) नुसार करून घेणेस, सदर कामासाठी १० दिवसाची मुदत देणेस तसेच सदरचा प्लान्ट कार्यान्वित झाल्या पासून ३ महिने सदर कंपनीने चालविणे व मनपा कर्मचा–यांना सदर कंपनी मार्फत प्रशिक्षण देण्यास.

तरी उपरोक्त बाब मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शहर अभि./१४२ दि. २५/५/२०२१ चे पत्र.

विषय क्रमांक :– २६८ त्वर्य

पुणे मनपा कार्यक्षेत्रातील आर्थिक दुर्बल घतकातील नागरिकांना शहरी गरीब योजनेअंतर्गत पुणे मनपाचे पॅनेलवरील असणा–या खाजगी रूग्णालयात Mucormycosis या आजारावर र.रू. तीन लाखापर्यंतचा १००% उपचार खर्चास मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवश्यावर खर्च करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१४३ दि. २५/५/२०२१ चे पत्र.

शिवाजी दौंडकर
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.